# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर

सुदामा शिक्षण संस्था, तुमसर द्वारा संचालित

# श्रीमती गोपिकाबाई भुरे महिला महा. तुमसर, जि. भंडारा

## राष्ट्रीय सेवा योजना

सत्र 2018–19

## विशेष शिबिराचा अहवाल

## " स्वच्छ व समृध्द समाजाकरिता युवाशक्ती "

दि. 23 जानेवारी ते 29 जानेवारी 2019

स्थळ : जि. प.प्राथमिक शाळा , काटेबाम्हणी तालुका मोहाडी ,जि. भंडारा

प्राचार्य

डॉ. युवराज सेलोकर

रा.से.यो कार्यक्रम अधिकारी

डॉ. निता सोमनाथे (गभने)

सहाय्यक अधिकारी

डॉ. कल्पना शिंदे (राऊत)

Scanned with OKEN Scanner

### 1) 23 जाने. 2019 बुधवार :– शिबीरार्थीचे आगमन

श्रीमती गोपिकाबाई भुरे महिला महा तुमसर द्वारा विशेष शिबीराचे आयोजन काटेबाम्हणी या गावात करण्यात आलेले होते . दि. 23 जानेवारी 2019 रोज बुधवारला शिबीरार्थीनींचे काटेबाम्हणी गावात आगमन झाले . सर्वप्रथम गावात प्रभातफेरी काढून नंतर ग्रामसफाई करण्यात आली .

### 2) 24 जानेवारी 2019 गुरुवार – उदघाटन समारोह

दि. 24 जानेवारी 2019 रोज गुरुवारला सकाळी 9.30 वाजता विशेष शिबीराचे रीतसर उदघाटन करण्यात आले . या शिबीराच्या उदघाटक मा.सौ. आशिका मारोतीजी मते (सरपंच, काटेबाम्हणी ) , अध्यक्ष मा.श्री नारायणरावजी तितिरमारे (संस्थापक श्री. सुदामा शिक्षण संस्था ,तुमसर ) , प्रमुख पाहुणे मा. श्री. प्रमोदभाऊ नारायणरावजी तितिरमारे ,(सहसचिव श्री.सुदामा शिक्षण संस्था, तुमसर) ,मा.श्री.यादवराव देवाजी सेलोकर (उपसरपंच काटेबाम्हणी) , मा.सौ.चेतना यशवंतजी तितिरमारे (ग्रा.पं.सदस्य,काटेबाम्हणी) ,मा.सौ.कल्पना अंगवत कुकडे (ग्रा.प.सदस्य काटेबाम्हणी) ,मा.सौ.किर्ती ज्योतिषतजी कडव (ग्रा.पं.सदस्यकाटेबाम्हणी) महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. युवराज सेलोकर हे उपस्थित होते.

सर्वप्रथम मा.सौ.आशिकाताई मते यांनी दीपप्रज्वलीत करुन आणि राष्ट्रीय राष्ट्रसंत तुकोडोजी महाराज व सरस्वतीच्या फोटोला मार्ल्यापण करुन का शिबीराचे रीतसर उद्घाटन करण्यात आले. राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ.निता सोमनाथे यांनी राष्ट्रीय सेवा योजनेचा उद्देश समजावुन सांगितला महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी आपल्या प्रस्ताविक भाषणातुन विद्यार्थी मार्गदर्शन केले. प्रमुख अतिथींनीं आपल्या मार्गदर्शनातून स्वंयसेविकांसमध्ये सामाजिक बांधीलकी निर्माण होण्याचे माध्यम म्हणजे विशेष शिबीर असे वक्तव्य केले. अध्यक्ष मा. नारायणरावजी तितीरमारे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून तरुणांनी विशेषतः महाविद्यालयीन आणि विद्यापीठीय युवकांनी देशातील लोकांच्या सेवेसाठी काही रचनात्मक कार्य केले पाहिजे. भारत हा खेडयांचा देश असल्या कारणाने खेडयांतील जनतेला स्वातंत्र्याची फळे उपभोगता आली पाहिजे . यासाठी त्यांना कार्यप्रवण केले पाहिजे. विशेष शिबीराच्या वतीने विद्यार्थी ग्रामीण भागातील लोकांना समजुन घेऊ शकतात असे मार्गदर्शन केले कार्यक्रमाचे संचालन डॉ. कल्पना शिंदे यांनी केले तर आभार डॉ. अरुणा थुल यांनी केले.

### आरोग्य शिबीर– 24 जानेवारी 2019 दुपारी 12.00 वाजता

दि. 24 जानेवारी 2019 ला दुपारी 12.00 वाजता आरोग्य निदान शिबीराला सुरुवात झाली हा शिबीर गावकऱ्यांसाठी आयोजित करण्यात आला होता मा. संजय बोंम्बार्डे (वद्यैकीय अधिकरी) श्री. व्ही.डी. बारापात्रे आरोग्य सेवक, उके मॅडम, श्री भौदे, कु आरती तांडेकर, श्रीमती गायधने , श्री. कुलरकर असे शासकीय रुग्णालयाचे पथक उपस्थित होते. या आरोग्य निदान शिबीराच्या माध्यामातुन गावकऱ्यांचे शुगर, बी.पी, सर्दी, खोकला ,ताप यांची तपासणी करण्यात आली या शिबीराच्या माध्यमातुन 175 ते 200 लोकांची तपासणी करण्यात आले आणि मोफत औषधाचे वाटप देखील करण्यात आले.

### .3) पशुचिकित्सा शिबीर दि.25 जानेवारी 2019 शुक्रवार सकाळी 8.00 वाजता

दि 25 जानेवारी 2019 ला गावकऱ्यांच्या जनावरांसाठी " पशुचिकित्सा शिबीर " आयोजित करण्यात आलेले होते. मा. नंदेश्वर सर (सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन , तालुका पशुवैद्यकीय सर्व चिकित्सालय मोहाडी आणि पथक) उपस्थित होते. या शिबीराच्या माध्यामातुन गावकऱ्यांच्या जनावरांची तपासणी करुन त्यांना मोफत औषधांचे वाटप करण्यात आले.

### अंधश्रध्देचे प्रयोगः दु. 2.00 वाजता

" अंधश्रध्देचे प्रयोग " यावर मार्गदर्शन करण्याकरिता मा. गोडबोले सर ,मा. दिनेशजी ठवकर , मा. चंद्रकात मेश्राम उपस्थित होते गोडबोले सरांनी स्वयंसेविकाना स्वतःच्या पायावर उभं राहण्यासाठी काय करायचे याविषयी मार्गदर्शन केले. मा. दिनेशजी ठवकर यांनी अंधश्रध्देचे काही प्रयोग करुन दाखविले आणि समाजातील अंधश्रध्दा कशी दुर करायची हे पटवुन सांगितले मेश्राम सरांनी प्रास्तविकेच्या काही प्रति. रा.से.यो अधिकारी डॉ. निता सोमनाथे यांना भेट दिल्यात.

### 4) 26 जानेवारी 2019 शनिवार –गणतंत्र दिवस

26 जानेवारी शनिवार गणतंत्र दिवसानिमित्त संपूर्ण पथक जि.प. शाळा काटेबाम्हणी येथे उपस्थित होते. प्रथम शाळेतील झेंडावंदन करण्यात आले त्यानंतर प्रभातफेरी काढुन ग्रामपंचायत परिसरात झेंडावंदनाचा कार्यक्रम झाला याप्रसंगी शाळाकरी मुलं स्वयंसेवक व समस्त ग्रामवासी सुध्दा उपस्थित होते

Scanned with OKEN Scanner

"कौशल्या विकास अंतर्गत रोजगार मार्गदर्शन" दु. 2.00 वाजता

या विषयावर मार्गदर्शन करण्याकरिता मा. अजय बोरकर, मा. प्रविण बोरकर , मा. गेडाम सर उपस्थित होते. यांनी कौशल्य विकासाच्या माध्यमातून कशाप्रकारे रोजगाराच्या संधी उपलब्ध होतात ते पटवून सांगितले. तसेच स्पर्धा परिक्षा ही काळाची गरज आहे. आपल्या पायावर उभं राहण्याकरिता स्पर्धा परिक्षेची तयारी कशी करायची हे सांगितले. इंग्रजी भाषा व्यवहारात असून ती शिकण्यावर भर देण्यात आला.

सांस्कृतिक कार्यक्रम : संध्याकाळी 7.00 वाजता

गणतंत्र दिवसाचे औचित्य साधून संध्याकाळी 7.00 वाजता सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यात विविध विषयावर आधारित कार्यक्रम स्वयंसेविकांनी गावक–यांसाठी दारूबंदी , स्त्री भृणहत्या ,मुकनाटय , एकांकीका सादर केले. गावातील शालेय विधार्थ्यांनी सुध्दा कार्यक्रम सादर केले.

5) 27 जानेवारी 2019 रविवार : शिबिर सहल

27 जानेवारीला सकाळी 9: 00 वाजता शिबिराची सहल गायमुख देवस्थान येथे नेण्यात आली. त्या ठिकाणी स्वयंसेविकांनी संपुर्ण देवस्थानाचा परिसर स्वच्छ केला. देवस्थान परिसरातील संपुर्ण कचरा गोळा करुन त्याची होळी केली.

" व्यक्तिमत्व विकास आणि सकारात्मक विचार " : दु. 2.00 वाजता

मा. नरेशबाबु दिपटे यांनी स्वयंसेविकांना प्रोजेक्टरच्या माध्यमातुन "व्यक्तिमत्व विकास आणि सकारात्मक विचार" यावर अतिशय सुंदर असे मार्गदर्शन केले. 61 स्वयंसेविकांना त्यांनी फाइल वाटप केल्यात प्रोजेक्टरच्या माध्यातुन त्यांनी विद्यार्थीनींना काही विडियो दाखविले आणि स्वतःमध्ये आत्मविश्वास कसा निर्माण करायचा हे पटवुन सांगितले .

6) 28 जानेवरी 2019 – सोमवार –समारोप कार्यक्रम

दि. 28 जानेवरीला 10.30 वाजता शिबिराचा समारोप कार्यक्रम घेण्यात आला कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. डॉ. युवराज सेलोकर ( प्राचार्य ,श्रीमती गोपिकाबाई भुरे महिला महा. तुमसर) उपस्थित होते. प्रमुख पाहुणे मा. अशोकजी तितिरमारे मा. सौ अशिकाताई मते , मा. यादोरावजी सेलोकर , मा. मारोतीजी मते उपस्थित होते . सर्वप्रथम स्वयंसेविकांनी मनोगत सादर केलेत त्यांनी आपल्या मनोगतातून व्यक्त केले की कशाप्रकारे हा सात दिवसीय शिबीर राबविण्यात आला त्यानंतर प्रमुख अतिथींनी स्वयंसेविकांनी केलेल्या कामाचं कौतुक केले आणि पुन्हा आमच्याच गावात तुम्ही पुढील वर्षी शिबीर घ्या अशी मागणी मा.सरपंच मॅडमनी केली. अध्यक्षीय भाषणातुन प्राचार्य म्हणाले की रा. से. यो. च्या माध्यामातुन काम करण्यासाठी आमच्या महाविद्यालयाचं पथक काटेबाम्हणी या गावात आलेल होतं स्वावलंबन ,चारित्र्यवर्धन व सामाजिक बांधिलकी या मुल्यांचा समन्वय अशाच शिबिराच्या माध्यामातुन विद्यार्थ्यामध्ये होत असतो म्हणुन राष्टीय सेवा योजना हे अतिशय चांगल माघ्यम आहे कार्यक्रमाचे संचालन रा. से. यो. अधिकारी डॉ. निता सोमनाथ यांनी केले तर आभार डॉ कल्पना शिंदे यांनी केले.

7) 29 जानेवारी 2019 मगळवार – निरोप व प्रस्थान

29 जानेवारी शिबीराचे प्रस्थान महाविद्यालयात झाले आणि स्वयसेविकांना निरोप देण्यात आला.

श्रमदान :– सकाळी सर्वप्रथम प्रार्थना व प्राणायम घेण्यात असे त्यानंतर श्रमदान घेण्यात आले श्रमदानाचा माध्यमातुन जि. प. प्राथमिक शाळेतील परिसरात खोदकाम करुन लेव्हल करण्यात आले तसेच ग्रामपंचायत परिसरात देखील स्वयंसेविकांनी श्रमदान केले.

ग्रामसफाई :– संपुर्ण काटेबाम्हणी गावाची ग्राम सफाई करण्यात आली गावाक–यांना स्वच्छतेचा संदेश स्वयंसेविकांनी दिला आम्ही गेल्यानंतरही तुम्ही तुमच गाव असचं स्वच्छ ठेवावे हे पटवुन सांगितले.

सर्वेक्षण:– गावातील कुटुंबातील जनावरांचे सर्वेक्षण या शिबीराच्या माध्यामातून स्वयंसेविकांनी केले. सर्वेक्षणाच्या माध्यामा –तून जनावरांचे वर्णन करण्यात आले.

या शिबीराचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. निता सोमनाथे (गभने) सहाय्यक अधिकारी डॉ. कल्पना शिंदे (राऊत) , डॉ. अरुणा थुल यांनी केले. हा शिबीर आयोजीत करण्याकरिता महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. युवराज सेलोकर यांनी वेळोवेळी सहकार्य केले तसेच श्रीकृष्णा तितिरमारे डेकोरेशन वाले दादा ,सुनील आचारी , सरपंच , उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामसेवक आणि स्वयंसेविका यांनी सहकार्य केले.

Scanned with OKEN Scanner

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर

सुदामा शिक्षण संस्था, तुमसर द्वारा संचालित

## श्रीमती गोपिकाबाई भुरे महिला महा. तुमसर, जि. भंडारा

## राष्ट्रीय सेवा योजना

सत्र 2018–19

# वार्षिक अहवाल

◈ प्राचार्य◈

डॉ. युवराज सेलोकर

◈रा.से.यो कार्यक्रम अधिकारी◈

डॉ. निता सोमनाथे (गभने)

सहाय्यक अधिकारी

डॉ. कल्पना शिंदे (राऊत)

Scanned with OKEN Scanner

# राष्ट्रीय सेवा योजना

## वार्षिक अहवाल

## सन 2018–2019

श्रीमती गोपिकाबाई भुरे महिला महाविद्यालय तुमसर येथे 2018 – 2019 या सत्रात राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने खालील कार्यक्रम घेण्यात आले.

### 1) योगा डे – 21 जून 2018

दि. 21 जून 2018 ला महाविद्यालयात योगा दिवस साजरा करण्यात आला, यामध्ये प्राध्यापक वर्ग, शिक्षकेत्तर कर्मचारी वर्ग आणि विद्यार्थीनीचा समावेश होता. विद्यार्थांमधील तणाव व अभ्यासाविषयी अनास्था लक्षात घेऊन हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाच्या माध्यमातून योगाचे महत्व पटवून सांगण्यात आले.

### 2) वृक्षसंवर्धन सप्ताह – 1 ते 7 जूलै 2018

या सप्ताहनिमित्त महाविद्यालयात निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. दि. 5–7–18 ला ही स्पर्धा आयोजित होती. "माय माऊली वृक्षाची सावली " 25 ते 30 विद्यार्थीनींचा समावेश होता.

तसेच वृक्षसंवर्धनाचे महत्व लक्षात घेता " पर्यावरण आणि मानवी संवर्धन" या विषयावर कार्यक्रम आयोजित करून विद्यार्थीनीना त्याचे महत्व पटवून सांगण्यात आले. बी. ए तृतीय वर्षाची विद्यार्थीनी कु. करिश्मा परिहार म्हणाली प्रत्येक विद्यार्थीनीने एक वृक्ष लावून त्याची काळजी घ्यायला पाहिजे.

### 3) जागतिक लोकसंख्या दिवस – 11 ते 17 जूलै 2018

जागतिक लोकसंख्या दिनानिमित्त महाविद्यालयात लोकसंख्येवर आधारित कार्यक्रम आयोजित करण्यात आला. " स्त्रियांच्या घटत्या संख्येचे कारण " या विषयावर विद्यार्थीनींना आपले मत व्यक्त केले. नॅक समन्वयक डॉ. कनिज बानु कुरेशी यांनी लोकसंख्या दिवसाचे महत्व पटवून सांगितले. कार्यक्रम अध्यक्ष डॉ. युवराज सेलोकर यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातून वाढत्या लोकसंख्येचे परिणाम यावर प्रकाश टाकला.

### 4) राष्ट्रीय जंतनाशक दिवस – 10 ऑगष्ट 2018

National Dewarming day (deworming)

आरोग्यविषयीचे महत्व आणि जाणिव या अनुषंगाने दि. 10 ऑगष्टला महाविद्यालयात राष्ट्रीय जंतनाशक दिवस आयोजित करण्यात आला. या दिवसानिमित्त महाविद्यालयात 1 ते 19 या वयोगटातील विद्यार्थीनींना "अल्बेन्डझोल" या गोळ्यांचे वाटप करण्यात आले. जवळ जवळ 250 ते 300 विद्यार्थ्यांना औषधाचे वाटप करण्यात आले. शासनमार्फत कुपोषणावर तसे जंत (कृमी) वाढ करणा–या आंतरिक घटकांवर विशेष लक्ष दिले जात आहे. त्यात जंतनाशक दिवस हे कार्यक्रमाचे प्राथमिक पाऊल म्हणुन 10 ऑगस्टला हा दिवस पार पाडला.

### 5) स्वातंत्र्य दिन आणि वृक्षरोपण कार्यक्रम – 15 ऑगस्ट 2018

महाविद्यालयात स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून वृक्षारोपणाचा कार्यक्रम घेण्यात आला. पारिजात, गुलमोहर, जांभुळ, आपटा, सप्तपर्णी यासारख्या वृक्षांची लागवड करण्यात आली. प्राचार्य डॉ. युवराज सेलोकर आणि डॉ. कनिज बानू कुरेशी यांच्या हस्ते वृक्षारोपण पार पाडण्यात आले. राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेविकांचा सक्रिय सहभाग होता.

### 6) स्वच्छ भारत मिशन 2018 – 30 ऑगस्ट 2018

स्वच्छ भारत मिशन अंतर्गत स्वच्छ सर्वेक्षण 2018 (554–18) एप्स बदल माहिती व मार्गदर्शन करण्यात आले. महाविद्यालय उपस्थित एकुण 379 विदयार्थ्यांचे मत नोंदणी करण्यात सागितले. ज्यांना (554–18) एप्स बदल माहीती कु. अनिता ही कुकडे (पंचायत समिती तुमसरे ) यांनी दिली. तसेच स्वच्छतेबददल देखील माहीती दिली.

Scanned with OKEN Scanner

## 7) सद्भावना पंधरवाडा – 20 ऑगस्ट ते 5 सप्टेंबर

महाविद्यालयात 20 ऑगस्ट ते 5 सप्टेंबर सद्भावना पंधरवाडा राबविण्यात आला. या पंधरवाडयानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

◆वक्तृत्व स्पर्धा :– 3 सप्टेंबर 2018 ला महाविद्यालयात वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आली. या स्पर्धेत सद्भावनेशी संबधित विषयांचा समावेश करण्यात आला होता. प्रथम क्रमांक कु. करिश्मा परिहार व द्वितीय क्रमांक कु. सीमा पटले हिला मिळाला.

◆निंबध स्पर्धा :– 4 सप्टेंबर 2018 ला निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. यात 30 ते 35 विद्यार्थीनींची समावेश होता. प्रथम क्रमांक कु. मधुमाला तोंडफाडे, द्वितिय क्रमांक कु. अंतकला पटले हिला मिळाला.स्पर्धेचा विषय "राष्ट्रीय एकात्मता" होता.

◆शिक्षक दिन :– 5 सप्टेंबर 2018 सद्भावना पंधरवाडयाचा शेवटचा दिवस आणि शिक्षक दिवसानिमित्त महाविद्यालयात कार्यक्रम आयोजित करण्यात आला. विद्यार्थीनींची स्वयंशासन करून संपुर्ण महाविद्यालयाची धुरा या दिवशी सांभाळली स्वतः शिक्षक बनुन विविध विषय शिकविले. शिक्षक दिवसानिमित्त मार्गदर्शनपर कार्यक्रम आयोजित करण्यात आला. पुष्पगुच्छ देवुन विद्यार्थीनींनी शिक्षक दिवसांनिमित्त आपले मत व्यक्त केले.अध्यक्षीय भाषणातुन प्राचार्य डॉ. युवराज सेलोकर यांनी शिक्षक दिवसाचे महत्व सांगितले.

## 8) स्वच्छता पंधरवाडा – 1 ऑगस्ट ते 15 सप्टेंबर

स्वच्छता पंधरवाडयानिमित्त विविध ठिकाणी परिसर स्वच्छता घेण्यात आली. महाविद्यालय , महाविद्यालयाच्या आजुबाजुचा परिसर , रेल्वे स्थानक येथील परिसर स्वच्छ करण्यात आला.

## 9) आंतरराष्ट्रीय साक्षरता दिवस – 8 सप्टेंबर 2018

आंतरराष्ट्रीय साक्षरता दिनानिमित्त दि. 8 सप्टेंबरला रॅलीचे आयोजन आणि जीवनात शिक्षणाचे महत्व यावर कार्यक्रम आयोजित करण्यात आला. रॅलीचे सुरूवात महाविद्यालयातुन झाली रॅली बस स्टॅन्ड , दुर्गा कॉलोनी , हसारा रोड या भागातुन महाविद्यालयात संपन्न झाली. जीवनात शिक्षणाचे महत्व या विषयावर राष्ट्रीय सेवा योजन अधिकार डॉ.निता दिलिपराव सोमनाथे सहाय्यक डॉ. कल्पना अनिल शिंदे यांनी आपले मत व्यक्त केले.

अशाप्रकारे 15 सप्टेंबरपर्यंत विविध कार्यक्रमांचे आयोजन महाविद्यालयात करण्यात आले. कार्यक्रमांचे राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी डॉ. निता दिलिपराव सोमनाथे सहाय्यक डॉ. कल्पना अनिल शिंदे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी डॉ. अरूणा थुल , करिश्मा परिहार ,सीमा पटले , अंतकला पटले , मधुमाला तोंडफाडे , प्राध्यापक वर्ग आणि शिक्षकेत्तर कर्मचारी वर्ग यांनी सहकार्य केले.

## 10) सामान्य ज्ञान स्पर्धा परिक्षा जागृती –18 सप्टेबर 2018

श्रीमती गोपिकाबाई भुरे महिला महा. आणि फिनिक्स स्पर्धा परिक्षा करिअर अकॅडमी तुमसर यांच्या संयुक्त विद्यमाने दि. 18–9–18 रोज मंगळवारला 11 वाजता स्पर्धा परिक्षा आयोजित करण्यात आली होती. स्पर्धा परिक्षा काळाची गरज लक्षात घेऊन या परिक्षेचे आयोजन करण्यात आले होते. यात 60 ते 65 विघार्थीतीचां सहभाग होता यात प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक मिळालेल्या विद्यार्थीनींना पारितोषिकांचे वितरण करण्यात आले.

## 11) राष्ट्रीय सेवा योजना दिवस–24 सप्टेंबर 2018

राष्ट्रीय सेवा योजना दिवस दि. 24–9–18 रोज सोमवारला महाविधालयात साजरा करण्यात आला. प्रमुख अतिथी डॉ. मिनाक्षी बेसेकर,, डॉ.कनिज बानू कुरैशी उपस्थित होत्या. या दिवशी स्वयंसेविकांनी सदैव काम करण्यास तत्पर राहु अशी शपथ घेतली. रा.से.यो. बोधवाक्य "माझ्यासाठी नव्हे तर तुमच्यासाठी" ज्या समाजात आपण राहतो त्या समाजाला समजुन घेणे व त्याचांसाठी कार्य करणे आपले कर्तव्य आहे असे मत प्रमुख पाहुण्यांनी व्यक्त केले.

Scanned with OKEN Scanner

## 12) गांधी जयंती –2 ऑक्टोबर 2018

राष्ट्रीय सेवा योजनेचा वतीने गांधी जयंती व शास्त्री जयंती निमित्त रॅलीचे आयोजन करण्यात आलेले होते ही रॅली संपुर्ण तुमसर शहरात फिरविण्यात आली. रा. से. यो. स्वयंसेविकांनी चौका चौकात स्वच्छतेवर आधारीत पथनाटय सादर केले. गांधीजींच्या जीवनावर विविध स्पर्धाचे आयोजन करण्यात आले. यात 30 ते 40 विधार्थीनीचां सहभाग होता.निबंध स्पर्धेत प्रथम क्रमांक कु. करिश्मा परिहार तर द्वितीय क्रमांक कु. सीमा पटले हिला मिळाला रा. से. यो. स्वयंसेविकांनी दुर्गा मंदिर व संपूर्ण परिसर स्वच्छ केला. रॅलीचा शेवट महाविद्यालयात झाला. रॅलीचे आयोजन रा. से. या प्रमुख डॉ. निता सोमनाथे व सहाय्यक डॉ. कल्पना शिंदे यांनी केले.

## 13) वाचन प्रेरणा दिवस–15 ऑक्टोबर 2018

डॉ. अब्दुल कलाम यांच्या जन्मदिवसा निमित्त "वाचन प्रेरणा दिवास" हा कार्यक्रम रा.से.यो. च्या वतीने महाविद्यालयात घेण्यात आला. या कार्यक्रमाला मार्गदर्शक म्हणून मा.मनोज सिडाम (पोलिस निरिक्षक तुमसर पो. स्टे.) मा. वृंदा गायधने समुपदेशक केन्द्र तुमसर अध्यक्ष मा. प्राचार्य डॉ. युवराज सेलोकर उपस्थित होत. याप्रसंगी या अब्दुल कलाम यांचे "अग्निपंख" या पुस्तकातील काही भागाचे वाचन विद्यार्थीनींनी केले. तसेच हात धुण्याचा कार्यक्रम घेण्यात आला.मा. मनोज सिडाम यांनी "सायबर क्राइम" या विषयावर विद्यार्थीनीना मार्गदर्शन केले. तसेच *M.P.S.C* आणि स्पर्धा परिक्षेच्या माध्यामातुन आपले भविष्य घडाविण्याचा निर्धार तुमच्यात असायला पाहिजे. मा. वृंदा गायधने मॅडमनी विद्यार्थीनींना स्वतःच्या पायावर उभं राहण्यासाठी जास्तीत जास्त शिक्षण घ्या असे मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. प्राचार्य डॉ. युवराज सेलोकर सरांनी वाचन प्रेरणा दिवसाचे महत्व पटवून सांगितले. कार्यक्रमाचे संचालन रा.से.यो. प्रमुख डॉ. निता सोमनाथे यांनी केले तर आभार प्रा. मंगेश वागदे यांनी केले.

## 14) संविधान दिवस – 26 नोव्हेंबर 2018

रा.सों. यो. वतीने 26 नोव्हेंबर 2018 महाविद्यालयात संविधान दिवसाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या दिवसाच्या सर्वप्रथम डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या फोटोला माल्यार्पण करण्यात आले त्यानंतर प्रास्ताविकेचे वाचन करण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी संविधान दिवस का साजराकरण्यात येतो त्याचे महत्व विशद केले.

## 15) महापरिनिर्वाण दिवस –6 डिसेंबर 2018

दि. 6 डिसेंबर 2018 ला महाविद्यालयात रा. से. यो. च्या वतीने महापरिनिर्वाण दिवसाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. सर्वप्रथम डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करण्यात आले. त्यानंतर बाबासाहेबांच्या जीवनाशी संबंधीत विषयावर प्रकाश टाकण्यात आला.

## 16) सावित्रीबाई फुले जंयती –3 जानेवारी 2019

राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने सावित्रीबाई फुले जयंती साजरी करण्यात आली. या. दिवसा निमित्त महाविद्यालयात " सावित्रीबाई फुलेचे शिक्षणाविषयक विचार " या विषयावर वक्तृत्व स्पर्धचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत 40 ते 50 विद्यार्थीनींचा समावेश होता. प्रथम कमांक कु. अंतकला पटले हिला मिळाला तर द्वितीय क्रमांक कु. रिंकी राठोड हिला मिळाला.

## 17) विशेष शिबीर–23 जानेवारी ते 29 जानेवारी 2019

राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष शिबिर दि. 23 जानेवारी ते 29 जानेवारी 2019 या कालावधीत काटेबाम्हणी तालुका मोहाडी या गावात घेण्यात आला.शिबीरात 61 विद्यार्थीनींचा सहभाग होता. विशेष शिबीराच्या वतीने विविध कार्यक्रम, शिबीर, सर्वेक्षण , श्रमदान, ग्राम स्वच्छता अशा विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

## 18) जागतिक महिला दिवस – 8 मार्च 2019

राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने दि.8 मार्च 2019 हा दिवस "जागतिक महिला दिन" म्हणून साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला अतिथी म्हणून ॲड. रचना गजभिये, ॲड मनिष रावलानी अध्यक्ष डॉ युवराज सेलोकर , मा. कनिजबानु कुरैशी उपस्थित होत्या. ॲड रचना–गजभिये यांनी "जीवनात एखादे पद धारण करण्यासाठी ठाम निर्णय घेणे, आणि चांगली महत्वकांक्षा बाळगणे आवश्यक आहे.

Scanned with OKEN Scanner

" बेटी बचाओ बेटी पढाओ " या विषयावर मार्गदर्शन केले. ॲड रावलानी सरांनी विद्यार्थीनीनां जागतिक महिला दिनानिमित्त शुभेच्छा दिल्या मा.कुरैशी मॅडमनी आपल्या मार्गदर्शनातून विद्यार्थीनींना सांगितले की महिलांनी संधी समजून घेतली तर संघर्षातून यशाची शिखर गाठता येतात स्वतः च्या पायावर उभं राहा त्यासाठी जास्तीत जास्त शिक्षण घ्या. अध्यक्षीय भाषणातून डॉ. सेलोकर सरांनी "मुलापेक्षा मुलगी बरी प्रकाश देते दोन्ही घरी " असे उद्‌गार काढतांना म्हटले की मुलीनां जवाबदारीचा सामना करावा लागतो त्यासाठी मुली शिक्षित असंण अतिशय आवश्यक आहे. तसेच त्यांनी "जीवन विशिष्ट ध्येयनिशी जगले पहिजे." असे मार्गदर्शन केले कार्यक्रमाचे संचालन डॉ. निता सोमनाथे (गभने ) यांनी केले तर आभारप्रदर्शन डॉ. कल्पना शिंदे (राऊत) यांनी केले.

## 19) कौशल्य विकास शिबीर –18 मार्च ते 20 मार्च

दि. 18 ते 20 मार्च या कालावधीत रा. से. यो. विभाग गुरूनानक भवन नागपुर येथे तीन दिवासीय कौशल्य विकास शिबीराचे आयोजन करण्यात आलेले होते .या शिबीरात प्रत्येक महाविद्यालयातील 4 स्वंय सेविकांना सहभागी करण्यात आलेले होते नागपूर विद्यापीठ अंतर्गत येणाऱ्या सर्व महाविद्यालयाचा यात समावेश होता एकुण 200 स्वयसेविकांचा हा शिबीर होता या शिबीराच्या माध्यमातुन विद्यार्थीनींना कौशल्य विकासासंबधी मार्गदर्शन करण्यात आले. राहणं आणि खाण्याची सुविधा राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने आली होती.

राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने वर्षभर घेण्यात आलेल्या कार्यक्रमाचे आयोजन कार्यक्रम अधिकारी आणि तालुका समन्वयक डॉ. निता सोमनाथे (गभने ) सहाय्यक डॉ. कल्पना शिंदे , डॉ. अरूणा थुल यांनी केलेले होते हे सर्व कार्यक्रम घेण्याकरिता महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. युवराज सेलोकर यांनी वेळोवेळी मार्गदर्शन केले. तसेच प्राध्यापक वर्ग, कर्मचारी आणि स्वयंसेविका यांनी सहकार्य केले.

S.G.B. Mahila Mahavidyalaya, Tumsar-441912

(Dr. Neeta somnathe)

Principal
S.G.B.Mahila Mahavidyalaya
Tumsar

Scanned with OKEN Scanner